ऐच्छिक सेवानिवृत्ती मंजुर करणे बाबत..
श्री. आघाव प्रकाश मारुती, वरिष्ठ सहाय्यक,
पंचायत समिती पाथर्डी.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग १
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-३/११४/२०२५
अहिल्यानगर दिनांक २४/०२/२०२५

वाचा:- १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील अधिकार प्रदान आदेश जा.क्र.साप्रवि-१/ साप्रवि-१/रवका/६९६/२०१६ दिनांक १७/०६/२०१६
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.कार्या१/आस्था-१ १२८३/२०२४ दिनांक /१२/२०२४
३. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/२०२४ दि १३/१२/२०२४
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.कार्या१/आस्था-१ ७०/२०२५ दिनांक २१/०१/२०२५
५. म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र ६६

ज्याअर्थी श्री आघाव प्रकाश मारुती, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती पाथर्डी, यांनी दिनांक १८/११/२०२४ च्या अर्जान्वये स्वेच्छा सेवानिवृत्ती करणेबाबत विनंती केलेली आहे.

संबंधित कार्यालय प्रमुखांनी श्री आघाव प्रकाश मारुती, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती पाथर्डी, यांचे विरुध्द कोणतीही चौकशी चालु नाही अथवा प्रस्तावित नाही असे दाखले सादर केले आहे. तसेच जिल्हा परिषद सर्वहन्टस को ऑप.क्रेडीट सोसायटी लि अहिल्यानगर यांचेकडील दिनांक १०/०१/२०२५ रोजीच्या दाखल्यानुसार श्री आघाव यांचेकडे रक्कम रुपये १७,३७,०००/- कर्ज वसुली दर्शविलेली आहे. तरी सदरची कर्ज वसुली ही श्री आघाव यांचे सेवा निवृत्ती वेतन विषयक लाभांमधुन करणेत यावी.

तरी नियुक्ती प्राधिकारी हे ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूरीस सक्षम प्राधिकरण आहेत. तथापी उपरोक्त संदर्भ क्रमांक १ चे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ अन्वये श्री आघाव प्रकाश मारुती, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती पाथर्डी, यांची दिनांक २८/०२/२०२५ रोजी मध्यानोत्तर ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूर करीत आहे.

सदरचा आदेश जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेला असुन त्यांचा सांकेतांक क्रमांक २०२५०२२४०४००२१ असा आहे.

Signed by
Shelke Rahul Ashok
Date: 25-02-2025 14:11:25
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री आघाव प्रकाश मारुती, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती पाथर्डी

द्वारा व प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

२/- सोबत आदेशाच्या दोन प्रती पाठविलेल्या आहेत. संबंधीतास एक प्रत बजावुन दुस-या प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. श्री आघाव प्रकाश मारुती, वरिष्ठ सहाय्यक, यांना दिनांक २८/०२/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर स्वेच्छा सेवानिवृत्त करणेकामी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच सेवानिवृत्त प्रकरणांची त्वरीत पुर्तता करावी.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत - निवड नस्ती